SHREE SIDDHIVINAYAK CO.-OP. HOUSING SOCEITY LTD.
श्री सिध्दीविनायक को.-ऑप. हौसिंग सोसायटी मर्यादित
नोंदणी क्रमांक : एन.बी.ओ.एम/सिडको/एच एस जी / (टी.सी)/१०५३३/डी. आर/सन २०२४-२०२५.
प्लॉट नं. ०५, पंप रुम नं. ०२, इमारत क्र. डी-०९ ते डी-१३ व इमारत क्र. डी-३२ ते डी-४४, सेक्टर-२१/२२, आयकर वसाहत, सी.बी.डी.-बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.
Mobile No.: 9619683427 E-Mail : siddhivinayakchs2002@gmail.com

Ref. No. : SS/29/25-26 Date : 10/08/2025

## विशेष सर्वसाधारण सभेचे मिनिटस्

(सहकारी संस्था अधिनियम 1960, सहकारी संस्था नियम 1961, शासन निर्णय दिनांक 03/01/2009 कलम 79A अन्वये व मॉडेल बायलॉज 2014 प्रमाणे)

संस्थेचे नाव : श्री सिद्धीविनायक को-ऑप. हौसिंग सोसायटी लि.

सभेचे ठिकाण : अहिल्याबाई होळकर सभागृह, सेक्टर - ९, नेरूळ, नवी मुंबई.

दिनांक व वेळ : १० ऑगस्ट २०२५, सकाळी १०:०० वा.

अध्यक्ष : श्री. लक्ष्मीकांत (सभासदांद्वारे विधिपूर्वक निवडलेले)

सचिव : श्री. संदीप डोईफोडे खजिनदार : श्री. राजू कांबळे

### १. गणपूर्ती (क्वोरम) पडताळणी व बैठकीची वैधता

संस्थेत एकूण १०८ सदनिका असून त्यापैकी ९५ सभासद वैध सदस्यत्वप्राप्त आहेत. मॉडेल बायलॉज क्र. ९६ व ९७ तसेच शासन निर्णय दिनांक ०३/०१/२००९ (कलम ७९अ) नुसार विशेष सर्वसाधारण सभेसाठी किमान २/३ उपस्थिती (६४ सदस्य) आवश्यक आहे. सदर सभेस ६६ सभासद उपस्थित असल्याने गणपूर्ती (क्वोरम) पूर्ण झाला व सभा वैध ठरली.

### २. सभेतील अजेंडा व ठराव

### अजेंडा क्र. १ : सिडकोसोबत लीज डीड बाबत निर्णय

ठराव:

सदर सभेत उपस्थित सर्व सभासदांनी पी.एम.सी. कडून प्राप्त feasibility reports व सादरीकरणांचा विचार करून एकमताने ठरविले की संस्थेचा सिडको सोबतचा लीज डीड (Lease Deed) हा पुनर्विकास प्रक्रियेचा अविभाज्य भाग म्हणून करण्यात यावा. तसेच हा लीज डीड कायदेशीर तरतुदीनुसार व सिडकोच्या नियम व अटींचे पालन करून, निवड झालेल्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) किंवा निवड झालेल्या डेव्हलपरमार्फत करण्यास संस्थेची संमती

नोंदविण्यात आली. (सहकारी संस्था अधिनियम 1960, मॉडेल बायलॉज क्र. 137, व शासन निर्णय दिनांक 03/01/2009 कलम 79अ नुसार)

Contd...2...

SHREE SIDDHIVINAYAK Co-Operative Housing Society Ltd.
NBOM/CIDCO/HSG/(T.C)/10533/D.R/YEAR 2024-2025

Ref. No. : SS/29/25-26 : 2 : Date : 10/08/2025

**अजेंडा क्र. २ : संयुक्त पुनर्विकास**

ठराव:

सिद्धीविनायक, शिवनेरी व नवरत्न या तिन्ही सोसायट्यांनी संयुक्तपणे इमारतींचा पुनर्विकास करावा व तो निवड झालेल्या डेव्हलपरमार्फतच करावा. (मॉडेल बायलॉज ७९ (क), शासन निर्णय ०३/०१/२००९ कलम ७९अ अन्वये)

**अजेंडा क्र. ३ : स्ट्रक्चरल ऑडिट**

ठराव:

इमारतींचे Structural Audit देखील निवड झालेल्या PMC/डेव्हलपरमार्फत करण्यात यावे. (मॉडेल बायलॉज १५८-ब व शासन निर्णय ०३/०१/२००९ नुसार बंधनकारक)

**अजेंडा क्र. ४ : प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांची नियुक्ती**

सचिवांनी सभासदांना PMC फर्मची नावे जाहीर केली व प्रत्यक्ष मतदानासाठी हात वर करून (Show of Hands) सहमती मागविली. ६६ पैकी ५९ सभासदांनी हात वर करून मेसर्स डायमेन्शन आर्किटेक्ट्स प्रा. लि. यांच्या PMC निवडीस सहमती दर्शविली. आवश्यक २/३ गणपूर्ती (क्वोरम) (६४ सदस्य) व किमान ५१% सभासदांची सहमती (४९ सदस्य) या अटींची पूर्तता झाल्याने ठराव वैध ठरला. त्यानुसार, मेसर्स डायमेन्शन आर्किटेक्ट्स प्रा. लि. यांची सोसायटीच्या पुनर्विकासासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणून विधिपूर्वक नियुक्ती करण्यात आली. (मॉडेल बायलॉज क्र. १५६ व १५७, सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ७९अ व शासन निर्णय दिनांक ०३/०१/२००९ अन्वये)

**३. कायदेशीर पूर्तता व कार्यवाही**

सर्व ठराव सहकारी संस्था अधिनियम १९६० (कलम ७९अ, कलम ७२, कलम ७३-आय), सहकारी संस्था नियम १९६१ (नियम ६० व नियम ६५), मॉडेल बायलॉज २०१४ (बायलॉज क्र. ७९, ९६, ९७, १३७, १५६, १५७, १५८-ब, १७३) तसेच शासन निर्णय दिनांक ०३/०१/२००९ कलम ७९अ मार्गदर्शक तत्त्वे यानुसार पारित करण्यात आले. निवड झालेल्या PMC बाबतची माहिती व ठरावाची प्रत उपनिबंधक सहकारी संस्था (सिडको क्षेत्र) यांना नियमानुसार कळविण्यात येईल.

**४. सभेचा समारोप**

सर्व ठराव एकमताने/बहुमताने मंजूर झाले. सभेची सांगता संध्याकाळी ८:०० वा. करण्यात आली.

| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |
|---|---|---|
| (श्री. लक्ष्मीकांत) | (श्री. संदीप डोईफोडे) | (श्री. राजू कांबळे) |

SHREE SIDDHIVINAYAK Co-Operative Housing Society Ltd. NBOM/CIDCO/HSG/(T.C)/10533/D.R/YEAR 2024-2025